अंक ६ : डिसेंबर २०१२

समजदार जोडीदार

# समजदार जोडीदार

सेंटर फॉर हेल्थ अँड सोशल जस्टिस - पुणे गावपातळीवरील जनजागृती व खाजगी वितरणासाठी प्रकाशित

## यशोगाथा

**ॲनिमेटर : संदीपान घाडगे**

गाव - लाखा,

संस्था - युवाग्राम विकास मंडळ, केज

लाखा या गावात आत्तापर्यंत एकही ग्रामसभा झाली नव्हती. ग्रामपंचायत पातळीवर महिला कायदेविषयी जी.आर. लागू करणे व त्यांची अंमलबजावणी व्हावी व ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना यांची माहिती गावातील लोकांना देण्यासाठी मी व गटसदस्यांनी सरपंच व ग्रामसेवक यांना ग्रामसभा आयोजित करण्यासाठी भाग पाडले व ग्रामसभा आहे हे लोकांना कळण्यासाठी कोऱ्या पेपरवर माहिती लिहून घरा - घरां वर लावण्यात आली. २ ऑक्टोबर निमित्त गावात पहिली ग्रामसभा झाली. यामध्ये गावात पाणलोट योजना आली आहे याची माहिती देण्यात आली. घर पती - पत्नीच्या नावावर व विवाह नोंदणी हे जी. आर. लागू करण्याचे ठरले. यामुळे गटसभासदांमध्ये नवी उमेद तयार झाली व ते उत्साही झाले.

तसेच गावात ग्रामपंचायत अंतर्गत सौर उर्जेचा दिवा लावण्याची मोहीम सुरू झाली असताना सरपंचाने स्वतःचा गट बघून व ज्या ठिकाणी गरज आहे ते सोडून दुसऱ्याच ठिकाणी दोन सौर उर्जेचे खांब रोवले. युवक गटातील कुंडलीक सालपे यांनी ही गोष्ट माझ्या व इतर गटसदस्यांच्या लक्षात आणून दिली. मी व गट सदस्यांनी त्या ठिकाणी जाऊन ते दिवे काढले. व ज्या ठिकाणी शाळा आहे व महिला रात्रीचे पाणी भरण्यासाठी हातपंपावर येतात त्या ठिकाणी सौर दिवे लावले यामुळे महिलांना रात्री पाणी भरण्यासाठी प्रकाश निर्माण झाला. तसेच दिवा बसविण्याअगोदर लोक हातपंपाच्या बाजूस शौचास बसत होते. ते आता दुर जावू लागले आहेत. तसेच अंधार असल्यामुळे महिलांना लैंगिक छळ होण्याची भिती वाटत होती ती आता कमी झाली.



**ॲनिमेटर : गौरीशंकर दोडडाळे**

गाव - चपळगाववाडी

संस्था - हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदुर

पुर्वी मी लैंगिकते विषयी अज्ञान होतो परंतू खेड-शिवापुर येथील प्रशिक्षणात लैंगीकतेबद्दल बरीच काही माहिती मिळाली व त्याचा उपयोग म्हणून मी गट सदस्यांना सर्व गोष्टी सांगितल्या व ते ऐकताना त्यांना सर्वच गोष्टींचं नवल वाटलं. पुढे गावातल्या काही प्रौढ व्यक्तींशी चर्चा केली. त्यांनी सुचविले की लैंगीकतेविषयी माहिती देण्याचे कार्यक्रम आपण आपल्या गावात घेऊ, म्हणजे सगळयांना त्याचा उपयोग होईल.

नंतर काही दिवसांनी एक विवाहीत गटसदस्य माझ्याकडे आला व त्याने लैंगीकते विषयी दिलेली माहिती अजून एकदा सांगा, असे म्हणाला. त्याचे कारण मी त्याला विचारले असता तो म्हणाला, दोन वर्षे लग्न होऊन झाले तरी गुड न्युज नाही. त्यामुळे माझी मानसिक स्थिती बरोबर नाही, असे तो म्हणाला. त्याने हेही मान्य

**पुरूषीपणा सोडू या - माणूस म्हणून जगूया.**

केले की, तो बायकोशी विचित्र प्रकारे संभोग करतो, लैंगिक त्रास देतो व चिडचिडपणा करतो.

मी त्याला प्रथम लैंगीकतेविषयी संपुर्ण माहिती दिली. तसेच गर्भधारणा ही लिंगाची जाडी, लांबी, जोरात संभोग, भरपूरवेळ संभोग इ. मुळे होत नसते तर त्याचा कालावधी हा मासिक पाळीनंतरच्या १०-२० दिवसांचा कालावधी असतो व या दरम्यानचा काळ गर्भधारणेसाठी उपयुक्त काळ असतो, असे सांगितले. तसेच मी सांगितलेल्या सर्व गोष्टी कधीच माहित नव्हत्या, असे तो म्हणाला.

---

## गट सदस्य- सोपान बाठे

गाव - दिवळे

संस्था - नारी समता मंच, पुणे

मला "नारी समता मंच" या संस्थेबरोबर काम करण्यास खूप आनंद वाटत आहे या संस्थेच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम आमच्या गावात राबवत आहे. खेळ, स्पर्धा, वाचन, सहली, आरोग्य मार्गदर्शन, कार्यक्रम, महिलांसाठी शासनाच्या योजनांचा माहिती कार्यक्रम इ. उपक्रम घेतो. सध्या आमचा असा प्रयत्न चालू आहे की, ग्राम सुरक्षा दल स्थापन करणे व त्यामध्ये २५ टक्के महिलांसाठी आरक्षण ठेवले आहे. तसेच महिला बचत गट स्थापन करणे, महिलांसाठी समाजात आपले हक्क मिळवण्यासाठी मुक्त व्यासपीठ तयार करणे, महिलांना प्रत्येक क्षेत्रात आपले अधिकार मिळाले पाहिजेत. यासाठी आमच्या गटातील सदस्य पुढाकार घेऊन त्यांना प्रोत्साहन देत आहेत.

तसेच स्त्रियांनी आपले हक्क काय आहेत, हे समजून घेतले पाहिजे समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात ताठ मानेने राहण्यास सुरूवात केली पाहिजे. यासाठी पुरुषांनी पुढाकार घ्यावा त्यामुळे त्यांच्यावर होणारे अत्याचार, अन्याय, छेडछाड, दमबाजी, अपमान व सासुरवास यांना नक्की आळा बसेल व मी असा संदेश देतो की " स्त्रियांनो संघटित व्हा, विचार मांडा, अन्याया विरूध्द लढा व अत्याचाराला मुळापासून उखडून काढा! "

## गट सदस्य- अमोल गायकवाड

गाव - वरवे

संस्था - नारी समता मंच, पुणे

आमच्या वरवे बु. गावामध्ये गेल्या दोन वर्षापासून "नारी समता मंच" या संस्थेद्वारे समजदार जोडीदार व स्त्री-पुरूष समानता या विषयांवर विवाहित पुरूषांचा गट व अविवाहित तरूणांचा गट यांच्या नियमित बैठका घेऊन विविध विषयांवर चर्चा होते.

या बैठकीत स्त्री-पुरूष समानता विषयावर विशेष भर दिला जातो. या चर्चेमुळे तरूणांमध्ये बरीच माहिती समजली जाते. त्यामध्ये मुलींचे घटते प्रमाण, स्त्रियांवरील अत्याचार कमी करणे घरामध्ये पुरूषांनी स्त्रियांना मदत करावी तसेच या बैठकीत पुरूषांच्या जबाबदारी विषयी जाणीव करून दिली जाते. फारच सुंदर अशा शब्दामध्ये माहिती समजावून सांगितली जाते. तसेच गावातील ग्रामपंचायतीत स्त्रीयांचा सहभाग असावा, यासाठी उत्तेजन दिले जाते. तसेच तरूणांना लैंगिक प्रशिक्षण दिले जाते.

या प्रकल्पामुळे मुख्य म्हणजे तरूणांमध्ये विशेष बदल घडून आला आहे. विशेषतः माझ्यामध्ये बदल झाला आहे. मी आता घरामध्ये कामात मदत करू लागलो आहे व माझ्या अनेक लैंगिक समस्यांचे निरसन या प्रकल्पातून झाले आहे. हा प्रकल्प एक चांगला समजदार जोडीदार होण्यास खरंच बहुमोलाचे योगदान करत आहे.

---

## ॲनिमेटर - सचिन भुसे

गाव - देवकतेवाडी

संस्था - अस्तित्व संस्था, सांगोला

देवकतेवाडी गावामध्ये एक महिलेला चार दिवसांपासून ताप सुरू होता. घरामध्ये परिस्थती अनुकुल नसल्यामुळे चार दिवस त्या महिलेकडे घरामधील पुरूषाने लक्ष दिले नव्हते. त्यानंतर गावामध्ये त्या घरामधील पुरूष आला व मी देवकतेवाडीचा ॲनिमेटर सचिन भुसे गावामध्ये होतो. तो म्हणाला अरे गाडी आहे का? पण मी म्हणालो का रे, तो म्हणाला माझ्या बायकोला दवाखान्यामध्ये घेऊन जायला. तो पुढे म्हणाला, मी आत्ताच सावकाराकडून पैसे काढून आणलेत. त्यावर

**नका करू लिंग निदान, मुलगीपण आहे देशाचा अभिमान .**

मी म्हणालो काय झालंय पत्नीला. तो म्हणाला चार दिवसांपासून ताप सुरू आहे व दवाखान्यामध्ये सलाईन लावतात व सलाईन लावायचे म्हटले तर कमीत कमी ३०० ते ४०० रू. लागतात, असे म्हणाल्यानंतर त्याला मी ग्रामीण रूग्णालयामध्ये जाण्याचा सल्ला दिला. त्यांनतर तो घरी विचारतो म्हणून माझ्या पासून निघुन गेला व घरी गेल्यावर त्याच्या पत्नीला त्याने विचारले की आपण शासकीय रूग्णालयामध्ये जाऊ या. यावर त्याची पत्नी म्हणाली मी माझ्या आई -बापाकडे जाते व तेथून पैसे आणून दवाखाना करते. यावर तो म्हणाला, अगं माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता. मला गावामधील सचिन म्हणाला की शासकीय दवाखान्यामध्ये जा. यावर त्याची पत्नी त्याला म्हणाली ज्यांचे वशिले आहेत, त्यांना ज्यादा प्रमाणात बघतात. आपल्याला गरिबाला कोण बघायला लागलंय. तो गप्पच बसला व बाहेर येऊन मला घडलेली हकीकत सांगितली. यावर मी त्यांच्या घरी जावून त्यांची समजूत काढली. व त्यांना सोबत घेऊन शासकीय रूग्णालयात गेलो. यावर डॉक्टरांना मी विचारले की डॉक्टर साहेब तुम्ही आमच्या सारख्यांच्या पुढाऱ्यांना सुविधा चांगल्या देता व गोरगरीबांना चांगल्या सुविधा देत नाही. यावर डॉक्टर म्हणाले सर्वांना एकच ईलाज असतो. पण काही जणांचा एक असा ग्रह आहे की पुढाऱ्यांना व पत्रकार अशा अनेक प्रसिध्द लोकांना चांगली वागणूक दिली जाते, पण असे काहीही नाही. शासकीय रूग्णालयात सर्वांना एकच दर्जा दिला जातो. यावर मी आणलेल्या पेशंटला समाधान वाटले. त्यावर ते पेशंट म्हणाले आजपासून काही झाले तर मी शासकीय रूग्णालयातच येणार. मित्राच्या बायकोला प्राथमिक आरोग्य केंद्रातून उपचार मिळवून देण्यास मदत केली.

---

## ॲनिमेटर - नितीन भडगळे

गाव - शिदोड

संस्था - सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड.

कविता - नार ही भिनार नाय ।

उठ गं हवसाा, उठ गं कवसा
कंबरेला पदर खवूनी
लय केला तुझा छळ सर्वांनी
तु उठ ग कंबरेला पदर खवूनी

मुलगीच झाली म्हणून
तुझ्या बापानं आपटलं ग तुला खाली
माय - माऊली तुझ्यासाठी रडत होती
घाय मुकी होऊनी
ये तु लवकर धावूनी
तु ऊठ कंबरेला पदर खवूनी

भावाचा तुझ्या लाड गं झाला
माझ्या वंशाचा दिवा म्हणूनी
नाही कधी तुला वेळेवर
चटणी - भाकर वाटयाला
दुध, तुप, मटण, बासूंदी
तीन टाईम त्याला खायाला

इकडून तिकडून लगीन झाले
दादला तुझा लय भारी
सासू, सासरा, दिर जसे
तिखट भाजीची फोडणी
करू दिला नाही संसार सुखानी
चल उठ कंबरेला पदर खवूनी

दादला तुझा दोन मुली
होईपर्यंत राहीला बघ आनंदानी
मला पोरगाच पाहिजे तुला
मुलीच झाल्या म्हणून गेला दुसरी
बायको करूनी
उठ गं हवसा उठ गं कवसा
कंबरेला पदर खवूनी

गुलामगिरीची बेडी तोडाया
उठणार नार मर्दानी
समजदार - जोडीदाराचा हेतू
हया तुम्ही समजूनी

उठ गं हवसा उठ गं कवसा
पदर कंबरेला खवूनी
लय छळ केला तुझा सर्वांनी
तु उठ कंबरेला पदर खवुनी

नितीन भडगळे
एस.पी.एम.एम., बीड

**भाई भी घरमे हाथ बटाये, तभी तो बहना पढने जाए ।**



अधिवेशना दरम्यान पत्नीच्या केसात फूल घालतांना
अस्तित्व संस्थेचे प्रेरक



कोळेकरवाडी मध्ये अभियाना निमीत्त
आयोजीत गावसभा



महिला हिंसा विरोधी अभियानाचा प्रारंभ, धांगवडी



महिला हिंसा विरोधी सामुहीक शपथ घेतांना
जुजारपूर मधील पुरूष व काही महिला



महिला हिंसा विरोधात पंढरपूर येथे पुरूषांची रॅली



पंढरपूर येथील अधिवेशनात सहभागी कार्यकर्ते

पिंपरी येथील
युवक व पुरूष
महिला हिंसा
विरोधी शपथ
घेतांना.



**संवाद, पालन - पोषण, देखभाल, हे पण आहे वडीलांचे काम.**